xcel5

RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ८(२)] शनिवार, एप्रिल ३०, २०११/वैशाख १०, शके १९३३ [पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ३८

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . | १-२ |


दिनांक ३० एप्रिल २०११ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ३० एप्रिल २०११ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९७७ चा महा. १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारताच्या गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २०११ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये, "रुपये पंधरा हजार" या मजकुराऐवजी, "रुपये पंचवीस हजार" हा मजकूर दिनांक १ मे, २०११ पासून दाखल करण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ च्या, पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल आणि ते नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"परंतु असे की, ज्यावेळी असे पद धारण करण्यासाठी किंवा असा सदस्य म्हणून राहण्यासाठी किंवा अशा प्रकारे नेमलेले असण्यासाठी अशा सदस्याला देय होणारे वेतन किंवा खंड (क) मध्ये निर्देशिलेले पारिश्रमिक त्याला कलम ३ अन्वये देय होणाऱ्या निवृत्तिवेतनापेक्षा कमी असेल त्यावेळी अशा व्यक्तीस त्या कलमाखालील निवृत्तिवेतनाची बाकी रक्कम मिळण्याचा हक्क असेल.".

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये, पोट-कलम (२-क) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२-ड) पोट-कलम (१), (२), (२-अ), (२-ब) किंवा (२-क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य विधानमंडळाच्या सदस्याच्या विधवेस किंवा विधुरास, किंवा अशा मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्यू पश्चात, त्या सदस्याचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर, अशा अज्ञान अपत्यास किंवा अपत्यांना, दिनांक १ मे, २०११ पासून दरमहा पंचवीस हजार रुपये या दराने निवृत्तिवेतन देण्यात येईल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR: SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

९०११५

RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ९] सोमवार, मे ९, २०११/वैशाख १९, शके १९३३ [ पृष्ठ १, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ४०

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

---

### शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक ३८, दिनांक ३० एप्रिल २०११, पृष्ठ क्रमांक १ ते २ वर प्रकाशित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २०११ (सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) मध्ये, पृष्ठ क्रमांक २ वर, कलम २ च्या समासटिपेमध्ये, "कलम ४" या ऐवजी "कलम ३" असे वाचावे.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.